या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | रविवार १२ मे २०२४ | अंक१५३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

## छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार घेवून जरांगे पुढे येत असतील तर सहकार्य करा शरद पवार यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी/बीड**

बीड: छत्रपती शिवाजी महाराजांचा सर्वधर्म समभावाचा विचार घेऊन मनोज जरांगे असो की आणखी कोणी पुढे येत असतील. तर त्या ऐक्याच्या विचाराला आपण सर्वांनी सहकार्य केलं पाहिजे. मनोज जरांगे पाटील यांचे धोरण काय? हे समजून घेण्यासाठी मी आणि राजेश टोपे या जिल्ह्यात येऊन जरांगे पाटलांना भेटलो भेटलो. त्यांना एक विनंती केली की, या राज्यात कोणताही जातीचा किंवा धर्माचा असो त्या सर्वांना सोबत घेऊन सामाजिक ऐक्य आपण मजबूत ठेऊ, असे आवाहन राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार म्हणाले. बीड लोकसभा निवडणूकीतील महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ शरद पवार यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथे प्रचार सांगता सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते अनील देशमूख, फौजीया खान, आ.राजेश टोपे, आ.संदीप क्षीरसागर, उमेदवार बजरंग सोनवणे, माजी आ.उषा दराडे, मा.आ.साहेबराव दरेकर, शिवसेना जिल्हाप्रमूख गणेश वरेकर यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना शरद पवार म्हणाले,आज मला एका गोष्टीची आठवण होते. बीड जिल्ह्यात संकट असेल दुष्काळ असेल, पण मनाने अतिशय दिलदार लोकांचा हा जिल्हा आहे. एकदा या जिल्ह्यामध्ये मी विनंती केली आणि विनंतीला मान देऊन जिल्ह्याने सर्वच्या सर्व आमदार आमच्या पक्षाचे निवडून दिले. या जिल्ह्याने ऐतिहासिक काम करुन दाखवले. आमदार दिले पण सत्ता दुसऱ्यांना दिली. आमदार सगळे आपले पण सत्ता दुसरीकडे आहे. त्यामुळे जिल्ह्यातील जनतेचं दुखणं कमी कसं करायचं? असा सवालही पवार यांनी केला.पुढे बोलताना शरद पवार म्हणाले, केंद्र सरकारमध्ये काम करण्याची संधी मला मिळाली. त्यावेळी बीडमध्ये एक कार्यक्रम आयोजित केला होता. त्या कार्यक्रमाला माजी हजेरी होती. व्यासपीठावर बसल्यानंतर जुन्या लोकांची आठवण झाली. या जिल्ह्याने क्रांतीसिंह नाना पाटील यांना मोठ्या मताधिक्याने विजयी केलं. नाना पाटील सातारा जिल्ह्याचे होते. उभे राहिले बीड जिल्ह्यात. या जिल्ह्यातील जनतेने स्वातंत्र्यासाठी त्याग केला. मोठ्या नेत्याचा सन्मान केला. नाना पाटील यांनी या जिल्ह्यात घोषणा केली होती. मात्र, सरकार बदल्यामुळे ती त्यांना पाळता आली नाही.सत्ता हातात आहे, पण शेतकऱ्यांच्या हक्कासाठी वापरली नाही.मात्र, बीड जिल्ह्याने आमचे आमदार सर्व आमदार निवडून दिले. त्यानंतर मी दिल्लीला गेलो आणि आठ दिवसाच्या आत ७१ हजार कोटींचं कर्ज माफ केलं. याचा लाभ देशातील सर्व राज्यांना झाला. ही कर्जमाफी संबंध देशातील लोकांना मिळाली. आज काय स्थिती आहे?, देश नरेंद्र मोदींच्या हातात आहे. अनेक भाषणं करतात. मात्र, शेतमालाला किंमत नाही. सर्व देशातील सत्ता हातात आहे, पण शेतकऱ्यांच्या हक्कासाठी वापरली नाही. दिल्लीत पंजाब, हरियणा भागातील शेतकरी दिल्लीत बसले. हमीभाव मिळावी, अशी मागणी केली, असंही शरद पवार म्हणाले.नरेंद्र मोदीचे सरकार हे शेतकरी विरोधी असून त्यांच्या हातात पुन्हा सत्ता देऊ नका. या सरकारला शेतकऱ्यांचा हिसका दाखवून द्या, अलिकडे दडपशाही सुरू झाली आहे. दिल्लीत चांगले सरकार चालविणारे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना जेलमध्ये घातले. सत्तेची गुर्मी आणि गैरवापर या सरकारकडून सुरू आहे. यांच्या सत्ता इतकी डोक्यात गेली आहे की कोणी टिका केली तर त्यांना सहन होत नाही. यामुळे मोदींना मदत होईल, असे काम मतदानातून करू नका. त्यांना रोखण्यासाठी बजरंग सोनवणेंना निवडूण द्या, या दुष्काळी भागात ऊसाला चांगला भाव देणाऱ्यांना विजयी करा, असे अवाहनही पवार यांनी केले. पाच हजाराचा चेक दिला मजदूर सेनेच्या वतीने ५ हजार रूपयांचा चेक बजरंग सोनवणे यांना देण्यात आला. तर आष्टीतील अनेकांनी या कार्यक्रमात प्रवेश केला. तर दिल्लीच्या तक्ताला लई भारी, शरद पवार, हे गित सरकटे यांनी गायीले.



**संदीप क्षीरसागर:** बीड जिल्हा हा शरद पवार यांच्या विचाराचा आहे. ज्यांनी आपल्याला सोडले त्यांना परत घेवू नका, आपली सत्ता येणार असून बजरंग सोनवणे यांना निवडूण आणा.

**सय्यद सलिम:** पालकमंत्री म्हणतात जातीवाद करू नका, पण त्यांच्याच समोर मोदींनी मुस्लिमांबाबत बोलून जातीयवाद केला.

**सुरेश नवले:** ७५ वर्षाचा तरूण सेनानी महाविकास आघाडीचे नेतृत्व करत आहे. याच बळावर भाजपचा तंबू हवेत फेकला जाईल. परळीची मक्तेदारी मोडीत काढून बजरंगला खासदार करा

**गणेश वरेकर:** उध्दव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांना पायऊतार व्हावे लागले. त्यावेळी शिवसैनिकांच्या डोळ्यात पाणी होते. त्या पाण्याचा बदला घेण्याची वेळ आलीय

**उत्तम जाणकर:** भाजपवाले विकास केल्याचे सांगतात. तर मग मोदींना माळसिरसच्या बाजारात फिरण्याची का वेळ आली. ज्यांनी धरगर समाजाला आरक्षण दिले नाही, त्यांच्या हातात आपली काठी न देता, त्यांच्या पाठीत काठी घाला

**लाव रे तो व्हिडीओ...** अनिल देशमूख यांनी मोदींनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू अशी गॅरंटी दिली होती. त्याबाबत 'लाव रे तो व्हिडीओ' म्हणत मोंदीचा व्हिडीओ दाखवत त्यांनी कोणतेच आश्वासन पुर्ण केले नसल्याचे म्हटले.तर देवेंद्र फडणविस यांचाही

**राजेश टोपे:** सर्व क्षेत्रातला अनुभव असलेला कुशल संघटक, तुमचा आवाज सभागृहात बुलंद करेल, अशा बजरंग सोनवणे यांना निवडूण द्या. लोभ आणि लाभापाई सद्या भारतीय जनता पार्टीकडे लोक गेले. ते द्वेशाचे राजकारण करत आहेत.

**अनिल देशमूख:** भारतीय जनता पार्टीविरूध्द देशात रोष आहे. महागाई आणि रोजगाराने सामान्यांची वाट लागली. शेतकऱ्यांचा कापूस घरात पडून आहे. त्याला भाव मिळत नाही. यामुळे अशा लोकांना पुन्हा सत्तेत येऊ देऊ नका

**बजरंग सोनवणे:** बीड जिल्ह्यात प्रस्तापितांच्या विरोधात लाट निर्माण झालेली आहे. गावागावात तुतारी वाजत आहे. साहेबांच्या समोर शब्द देतो, उतणार नाही, मातणार नाही. समोरचे लोक ओबीसीचे राजकारण करत आहेत, परंतु ओबीसींसाठी तुम्ही काय केलं हे तर सांगा. मी शेतकऱ्यांचे, त्यांच्या लेकरांचे भले करण्याचे काम करायचे आहे. मला त्यांची पालखी वहायची आहे. तुमचा सालगडी म्हणून राबण्याची संधी द्या.

## शंभर रुपयांच्या बॉण्डवर दिली लेखी हमी लोकसभेत गेल्यावर मराठा धनगर मुस्लिम आरक्षणासाठी कटिबद्ध-अशोक हिंगे पाटील

मी लोकसभेत गेल्यावर मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे धनगड धनगर या मुद्द्यावर राखडलेले धनगराचे आरक्षण मिळावे, कोर्टाने मान्य केलेले मुस्लिमांचे पाच टक्के आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी यासाठी मी कटिबद्ध असल्याचे अशोक हिंगे पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. तसेच यावेळी आरक्षणाच्या मागणीसाठी शंभर रुपयांच्या बॉण्डवर लेखी हमी दिली.

पत्रकार परिषदेत बोलताना हिंगे पाटील म्हणाले की, आज लोकसभेच्या निवडणुका विकासाच्या मुद्द्यावर लढल्या जात नाहीत. माझ्या समोरील दोन्हीही उमेदवार जातीपातीचे राजकारण करून मते पदरात पाडून घेण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्रात राजकारण करताना कधीही जात पाहिली नाही. मराठा आरक्षणाच्या मागणीवर मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवाली सराटी येथे चालू असलेल्या आंदोलनाला प्रथम प्रकाश आंबेडकर यांनी भेट दिली गरजवंत मराठा समाजाला आरक्षण मिळावे ही भूमिका प्रकाश आंबेडकर यांची आणि आमचे देखील आहे मात्र महाविकास आघाडीचे शरद चंद्र पवार यांनी कधीच ठोस भूमिका घेतली नाही आणि आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी कधीही मराठा आरक्षणासाठी आंदोलन केले नाही आणि कधी सहभागही घेतला नाही बजरंग सोनवणे यांना मराठा समाजाला जातीच्या नावावर मत मागण्याचा अधिकार नाही . ज्यावेळी ओबीसीच्या आरक्षण धोक्यात आले त्यावेळी पंकजाताईंनी कुठलीच भूमिका घेतली नाही त्यामुळे त्यांना देखील ओबीसी जातीच्या नावावर मत मागण्याचा कुठलाच अधिकार उरत नाही असे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील म्हणाले माझ्या समोरील उमेदवारांकडे विकासाचा कोणताच मुद्दा नसल्याने जातीपातीचे डाव टाकून मतदारांना मूर्ख बनवण्याचे काम चालू केले आहे ते थांबवावं आत्तापर्यंतच्या सरकारने समाजाला झूलवत ठेवलं म्हणून जनतेचा विश्वास संपुष्टात आला आहे त्यामुळे समाजातून लेखी हमी देण्याची मागणी होत होती त्यानुसार मी आज शंभर रुपयांच्या बॉण्ड वर मराठा धनगर मुस्लिम आरक्षणासाठी कटिबद्ध असल्याची लेखी हमी दिली आहे असे अशोक हिंगे पाटील यांनी सांगितले तरी माझी बीड जिल्ह्यातील तमाम जनतेला विनंती आहे की माझ्या गॅस सिलेंडर समोरील बटन दाबून मला प्रचंड मताधिक्याने विजयी करावे मी आपल्या जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध असेल असेही अशोक हिंगे पाटील म्हणाले

## रामदास बहीर यांना पितृशोक



कृषी उत्पन्न बाजार समिती बीडचे माजी सचिव रामदास बहीर यांचे वडील पाटीलबुवा बहिर यांचे शुक्रवारी रात्री वर्धापकाळाने निधन झाले ते ९५ वर्षाचे होते. नवगण राजुरी येथील प्रगतिशील शेतकरी पाटीलबुवा पाराजी बहिर यांचे शुक्रवार दि. १० रोजी रात्री दुःखद निधन झाले त्यांच्यावर शनिवारी सकाळी त्यांच्या शेतात शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले ,दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## टपाली मतदान केंद्राला निवडणूक निरीक्षकांनी दिली भेट अजीमुल हक यांची सूक्ष्म निरीक्षकांसोबत बैठक

बीड, दि. 11:- अपर जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या परिसरात सुविधा केंद्राच्या माध्यमातून टपाली मतदान सुरू असून या केंद्राला निवडणूक निरीक्षक अजीमुल हक यांनी आज भेट दिली.

बीड लोकसभा मतदारसंघातील टपाली मतदान सुरू असून तहसील कार्यालय तसेच अपर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात सुविधा केंद्राच्या माध्यमातून टपाली मतदान केल्या जात आहे. या टपाली सुविधा मतदान केंद्राला आज निवडणूक निरीक्षक अजीमुल हक यांनी भेट दिली. यावेळी अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, सहाय्यक उपजिल्हाधिकारी तथा टपाली मतदान नोडल अधिकारी शैलेश सूर्यवंशी यावेळी उपस्थित होते. यानंतर त्यांनी अपर जिल्हाधिकारी यांच्या कक्षात स्ट्राँग रूम संदर्भातील कामांची आणि तेथील सुरक्षितेबाबतची चर्चा केली. यासह 13 मे रोजी होणाऱ्या



निवडणुकीच्या काळात विधानसभा निहाय केलेले सुव्यवस्था बद्दलही चर्चा झाली.

अजीमुलहकयांचीसूक्ष्मनिरीक्षकांसोबतबैठक निवडणूक निरीक्षक अजीमुल हक यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात सूक्ष्म निरीक्षकांची बैठक घेतली. यावेळी श्री हक, जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे उपस्थित होते. निवडणुकीच्या दिवशी नियुक्त सूक्ष्म निरीक्षकांनी थेट निवडणूक निरीक्षकांना अहवाल सादर करणे आहे. हे सुक्ष्म निरीक्षक लोकसभा बीड मतदार संघातील सहा विधानसभा मतदारसंघात नियुक्त असून ते सेक्टर अधिकारी यांच्याकडून अहवाल घेऊन निवडणूक निरीक्षकास सादर करतील. कोणत्याही विधानसभा मतदार संघ क्षेत्रात काही अनुचित प्रकार घडत असल्यास तातडीने माहिती देण्याचे काम हे निवडणूक निरीक्षक करतील. आज त्यांना याबाबत सूचना आणि मार्गदर्शन देण्यात आलेले आहे.

संपादकीय

## शक्ती-1 आण्विक क्षेपणास्त्र: यशस्वी चाचणी!

देशभरात ११ मे हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. तंत्रज्ञान हे मानवी संस्कृती घडवणाऱ्या घटकांत शासनव्यवस्था, समाजरचना, कर्म, तत्वज्ञान यांच्या इतकेच महत्व दिले आहे. तंत्रज्ञान हे मानवी सर्जनशील प्रज्ञेचे द्योतक आहे. तंत्रज्ञान विकसनामुळे मानवाचे जीवन अधिक सोयीस्कर बनत चालले आहे. पण हा दिवस आजच्या तारखेलाच का साजरा करतात? यासाठी श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा हा लेख... संपादक.

आजच्या दिवशी- दि.११ मे १९९८ रोजी भारताने एरोस्पेस अभियंता आणि दिवंगत माजी राष्ट्रपती डॉ.एपीजे.अब्दुल कलाम यांच्या मार्गदर्शनाखाली मोलाची कामगिरी केली. ती कामगिरी राजस्थान येथील भारतीय लष्कराच्या पोखरण चाचणी क्षेत्रातील होती. त्यात शक्ती-१ या आण्विक क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वीपणे पार पाडली गेली. या प्रगतीचे प्रतीक ११ मे हा दिवस दरवर्षी राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. याशिवाय याच काळात देशातच विकसित झालेल्या पहिल्या स्वदेशी विमान हंस-१ने पहिले उड्डाण बेंगळुरू येथे घेतले. हे विमान वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे विमान नॅशनल एरोस्पेस लॅबोरेटरीजने विकसित केले होते. तसेच कमी पल्ल्याचे, जलद- प्रतिक्रिया देणारे, जमिनीवरून हवेत मारा करणारे- एसएएम क्षेपणास्त्र- त्रिशूल हा भारतातील गाइडेड क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाचा एक भाग होता. देशाच्या या प्रचंड यशानंतर भारताचे तत्कालीन माजी पंत्रप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी ११ मे हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस म्हणून घोषित केला. भारतात सन १९९९पासून दरवर्षी तंत्रज्ञान विकास मंडळ यांच्या नेतृत्वात हा दिवस साजरा केला जातो.

दि.११ मे १९९८ रोजी भारतात यशस्वी अणुचाचणी घेण्यात आली होती. त्यानंतरच अण्वस्त्रे असलेल्या देशांच्या यादीत भारताचे नाव समाविष्ट झाले. भारताने ऑपरेशन शक्ती अंतर्गत राजस्थानच्या पोखरण येथे यशस्वी अणुचाचणी केली. त्यानंतर १३ मे रोजी दोन विभक्त चाचण्या घेण्यात आल्या. या चाचण्यांचे नेतृत्व माजी राष्ट्रपती डॉ.एपीजे. अब्दुल कलाम यांनी केले. त्यानंतर दि.११ मे १९९९ रोजी प्रथमच राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन साजरा करण्यात आला आणि तेव्हापासून हा दिवस दरवर्षी साजरा केला जाऊ लागला. या दिवसाची घोषणा तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी केली होती. या दिवसापासून आजपर्यंत तंत्रज्ञान विकास मंडळाने तांत्रिक क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल शास्त्रज्ञ व अभियंत्यांना सन्मान व प्रोत्साहन दिले आहे. वैज्ञानिक, डीआरडीओ- संरक्षण संशोधन आणि विकास संस्था, भाभा अणुसंशोधन केंद्र- बीएआरसी आणि एएमडीईआर- अणू खनिज संचालनालय अन्वेषण आणि संशोधन यांनी यशस्वीरीत्या चाचणी केली. हेच कारण होते ज्यामुळे भारत थर्मोन्यूक्लियर शस्त्रे तयार करण्यास सक्षम बनू शकला.

आज नॅशनल टेक्नोलॉजी डे- राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून भारतासाठी आजचा दिवस खास आहे. हा दिवस भारतासाठी अनेक कारणांमुळे विशेष आहे.

# विश्वबंधुत्वही मेरा मिशन: निरंकारी बाबा!

"जीवन के हैं दो
किनारे एक जन्म हैं एक मरण।
जो जन्मा हैं वो
मरता हैं धनवंता हैं या निर्धन।
जन्म मरण के बीच
का जीवन श्रेष्ठ हैं अनमोल हैं।
कहें 'हरदेव' कि गुरु
ज्ञान से पड़ता इसका मोल हैं।"
[ पवित्र सम्पूर्ण हरदेव बाणी: पद क्र.१६०]

आजच्या बहुढंगी, बहुरंगी दुनियेत स्वतःला ईश्वरी अवतार मानून आपले बाजारमूल्य वाढविण्याची स्पर्धा भक्तीपंथात जोमाने फोफावलेली दिसून येत आहे. या स्पर्धेतूनच अनेक पाखंडी कलंकित होत आहेत, शांती, संयम आणि औदार्य अशा त्रिगुणांच्या अनोख्या संगमामुळे संतशिरोमणी हृदयसम्माट सत्यसम्राट बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी लाखो अनुयायी जोडले आणि मानवतेची पूजा करणारा निरंकारी पंथ जगभर पसरविला. संत निरंकारी मिशनमध्ये जगातील सर्व जाती-धर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदू लागले, कारण कोणाच्याही व्यक्तिगत जीवनशैली किंवा श्रद्धा भावनांना धक्का न लावता केवळ मानवतेच्या आधारावर आपुलकी, प्रेम, सद्भावना, सामंजस्याने व एकोप्याने आनंदाने जीवन जगायला शिकवणारी विचारधारा युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजींनी जोपासली व वृद्धिंगत केली. बाबाजी यथार्थ व यशस्वी मानवी जीवन जगण्याची कला शिकवत असत. त्यांनी आध्यात्मिक व भौतिक जीवनाशी अशी सुंदर सांगड घातली, त्यामुळेच जगभर ही विचारधारा लोकप्रिय बनली व हवी हवीसी वाटू लागली. कारण संतोक्तीची प्रचिती त्यांच्या पावन सान्निध्याने आली. जगतगुरू जगतवंद्य संतश्रेष्ठ तुकारामजी महाराजांनी समजाविले होते-

"मागे पुढे ब्रह्म दाटे! म्हणती देव आहे कोठे!!
मृगा नाभिचा परिमळ! व्यर्थ फिरे रानोमाळ!!"
गुरुकृपा झाल्यावरी! ब्रह्म सृष्टी दिसे सारी!!
तुका म्हणे ऐसी भ्रांती! देव असता नाही म्हणती!!

संयुक्त राष्ट्रसंघाने आपल्या सामाजिक व आर्थिक परिषदेवर संत निरंकारी मंडळाला सल्लागाराचा दर्जा दिला. सन २०१३मध्ये बाबाजींना गांधी ग्लोबल फॅमिलीच्या वतीने प्रतिष्ठित महात्मा गांधी सेवा मेडलने सन्मानित करण्यात आले, तर सन २०१४मध्ये गांधी शांती पुरस्कार प्रदान करण्यात आला. दि.५ ऑगस्ट २०१५ रोजी इंग्लंडमध्ये स्वेच्छा सामाजिक सेवेसाठी देण्यात येणाऱ्या सर्वोच्च क्वीन्स गोल्डन ज्युबिली अॅवॉर्डने बाबाजींना सन्मानित करण्यात आले. कारण माणसाशी माणसे जोडून मानवता धर्म स्थापित केला. संतश्रेष्ठ गोस्वामी तुलसिदासजींच्या वाणीतून प्रत्यय आला-

"सुनहु देव सचराचर स्वामी।
प्रनतपाल उर अन्तरजामी।।
उर कुछ प्रथम वासना रही।
प्रभु पद प्रीति सरित सो बही।।"
(पवित्र रामचरित मानस: ५-४९-३)

(अर्थ: बिभिषणजीने कहा, हे देव, हे चराचर जगत के स्वामी! हे शरणागत के रक्षक! हे सबके हृदय के भीतर के जानने वाले! सुनिए, मेरे हृदय में पहले कुछ वासनाएँ थी। वह प्रभु के चरणों की प्रीतिरूप नदी में बह गईं।)

सत्यसम्राट हृदयसम्राट बाबा हरदेवसिंहजी महाराज यांचा जन्म दि.२३ फेब्रुवारी १९५४ रोजी दिल्ली येथे झाला. सन १९७१मध्ये त्यांनी निरंकारी सेवादलामध्ये प्राथमिक सदस्य म्हणून प्रवेश केला आणि सेवादलाची सुती खाकी वर्दी घालून सेवेचा आनंद लुटला. सन १९७५ मध्ये त्यांनी निरंकारी युथ फोरमची स्थापना केली. या फोरमचे लक्ष्य होते- साधे व सदाचारी जीवन जगणे, प्रेम व भक्तिपूर्ण सेवा, अनावश्यक उधळपट्टीला आळा आणि नशाबंदी साधणे. दि.२४ एप्रिल १९८० रोजी कट्टरपंथी धर्मांधांनी मिशनचे तत्कालीन प्रमुख, सद्गुरू बाबा गुरुबचन सिंहजी यांच्यावर निशाना साधून शहीद केले. तरुण बाबा हरदेवांनी शरीररुपातील सद्गुरु व पिताही गमावला होता. निरंकारी मिशनच्या प्रत्येक अनुयायाचे धैर्य, संयम आणि सहनशीलता पणाला लागावी असा तो क्षण होता. दि.२७ एप्रिल १९८० रोजी बाबा हरदेवसिंहजींना मिशनचे सांप्रत सद्गुरू व प्रमुख म्हणून घोषित करण्यात आले. शांती, प्रेम आणि विश्वबंधुत्व स्थापन करण्याचे आश्वासन कृतीत उतरविण्यासाठी बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी देश-विदेशांमध्ये विस्तृत प्रचार यात्रा आयोजित केल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संत निरंकारी मिशन मानवता, विश्वबंधुत्व, प्रेम, शांती, समता, अहिंसा अशी महान ध्येये गाठणारी आध्यात्मिक चळवळ बनून नावारुपाला आली आहे. सर्व धर्मग्रंथांचे अमूल्य सारामृत त्यातून प्रवाहित केले. गुरु नानकदेवजींचे अनमोल वचन सार्थक वाटतात-

"गुरु किरपा जेहि नर पैं कीन्ही तिन यह जुगति पिछानी!
नानक लीन भयो गोबिंद सों ज्यो पानी संग पानी!!"
[पवित्र भजन संग्रह- गीता प्रेस: पृ.सं.१८०]

सन २०१६ मधील जून महिन्याच्या शेवटी होऊ घातलेल्या द्वितीय निरंकारी आंतरराष्ट्रीय संत समागमाच्या पूर्वतयारीची पाहणी करण्याच्या उद्देशाने ते कॅनडाच्या कल्याण यात्रेवर असतानाच दि.१३ मे २०१६ रोजी त्यांची गाडी अपघातग्रस्त झाली आणि त्यातच मानवतेचे कार्य करत असतानाच त्यांनी आपल्या नश्वर देहाचा त्याग केला. धन्य धन्य ते हृदयसम्राट बाबा हरदेवसिंहजी महाराज आणि त्यांचे अहर्निश मानवोत्कर्षाचे आध्यात्मिक कार्ये! मिशनमधील त्यांच्या भरीव कार्याची आठवण म्हणून त्यांचा स्मृतिदिन हा मिशनतर्फे 'निरंकारी समर्पण दिवस' म्हणून पाळला जात आहे.

"मैं नही तो कुछ न होगा सोचना नादानी हैं।
सारे सिलसिले हैं मुझसे ये कहना बेमानी हैं।
ऐ मिट्टी के पुतले इतना क्यों करता अभिमान तू।
कहे 'हरदेव' इस दुनिया में दो दिन का मेहमान तू।"
[पवित्र सम्पूर्ण हरदेव बाणी: पद क्र.२८४]

!! प्रेमाने बोला जी, धन निरंकार जी !!

**श्रीकृष्णदास(बापू)निरंकारी.**
**द्वारा- प.पू. गुरुदेव हरदेव कृपानिवास.**
**मु. रामनगर वॉर्ड नं. २०, गडचिरोली.**
**जि. गडचिरोली. फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३.**

# शरद झोडगे यांनी पंकजाताई यांच्या विजया साठी बालाघाटावर बांधली महायुतीची मोट !

(बीड प्रतिनिधी) वयाच्या अठराव्या वर्षापासून ते आजतागायत भाजपाचे खंदे समर्थक व हाडाचे कार्यैकर्तै म्हणुन ओळखले जाणारे व विद्यमान बीड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा भाजपा नेते असलेल्या शरद झोडगे यांनी भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडेंना खासदार बनवण्यासाठी बालाघाटावर महायुतीची मोट बांधली आहे. शरद झोडगे यांनी आपल्या तरुणाईची सुरुवात भारतीय जनता पार्टीचा कार्येकर्तो म्हणुन केली होती, पक्षाशी असणारी एकनिष्ठता राखत आणी जनतेशी नाळ जोडत त्यांचे कार्य अहोरात्र सुरु असल्यामुळे बालाघाटाच्या गावागावात शरद झोडगे यांचा जनसंपर्क मोठा असुन तरुणांची मोठी फळी त्यांच्या मागे कायम उभी असते. कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, कामगार,आणी सामान्य गावकर्यांच्या मदतीसाठी रात्री अपरात्री धावुन



जाणारा कार्यकर्ता म्हणून शरद झोडगे यांची ओळख आहे.सध्या लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या पंकजाताई मुंडेना बालाघाटातुन विक्रमी मतदान करण्यासाठी शरद झोडगेंनी महायुतीची मोट बांधत गाव,वाडी,वस्ती, गल्लोगल्ली मतदारांशी हितगुज साधत व त्यांचे प्रश्न जाणुन घेत बालाघाट परिसर पिंजून काढला आहे. तसे पाहता बालाघाट परिसर हा कायम मुंडे कुटुंबाच्या पाठीशी राहणारा व हक्काचे मतदान असणारा परिसर आहे,स्वर्गीय मुंडेच्या शब्दावर आणि त्यांच्यावरील असणाऱ्या प्रेमामुळे आजतागायत बालाघाटावरील नागरिकांचे मत म्हणजे भाजपाच्या उमेदवाराला मत असे समिकरण बनलेले आहे, बालाघाटच्या गावागावात कमळ निशाणी पोहचवण्यासाठी शरद झोडगे सारखे निष्ठावंत असल्यामुळे सध्या पंकजाताई मुंडेचा विजय कुणीच रोखु शकत नाही,मुंडे कुटुंब व भारतीय जनता पक्षाशी इमान असलेल्या शरद झोडगे पाटील यांनी महायुतीतील सर्व नेत्यांना एकत्र आणत पकंजाताई मुंडे यांच्या पाठीमागे प्रचंड मोठी ताकत बालाघाटावर उभी केली असुन माजी सभापती काकासाहेब जोगदंड,पस सदस्य सुनिल झोडगे,अनुसुचित जातीमोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर,प स सदस्य दिपक काळे, सुंदर लांडगे,शिवाजी शिंदे शहादेव चौधरी,सरपंच अप्पासाहेब झोडगे,भाजपा अल्पसंख्याक आघाडी बीड तालुका अध्यक्ष सलीम जहागिरदार,भागवत तांदळे भुषण झोडगे,मोहनराव जोगदंड,बबलु शिंदे,कुमार मिटकरी,गणेश काकडे,ज्ञानेश्वर आंधळे,सुधीर चौधरी,अमोल कांबळे,शहादेव जोगदंड,लखन जोगदंड,अक्षय माळी यांच्यासह बालाघाटावरील अनेक नेते कार्यकर्ते एकत्र आणत पकंजाताई मुंडे यांना बळ देण्याचे काम बीड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा भाजपा नेते शरद झोडगे हे करत आहेत स्व गोपिनाथरावजी मुंडे यांचा विश्वासु कार्यकर्ता म्हणुन शरद झोडगे यांच्याकडे पाहीले जाते.

# जिजाऊ , ज्ञानराधा मल्टीस्टेट, साई अर्बन च्या सर्व ठेवीदारांना न्याय मिळवून देणार :- अशोक हिंगे पाटील



बीड जिल्ह्यात गेल्या सहा महिन्या पासून खाजगी बँका नी गोरगरीब जनतेच्या ठेवी घेऊन पळून जाण्याचे प्रकार घडल्या मुळे ठेवीदार हवालदिल झाले आहेत माँसाहेब जिजाऊ बँक, ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम अर्बन च्या सर्व ठेवीदारांना न्याय मिळवून देणार असल्याचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी ठेवीदाराच्पा बैठकीत सांगितले आहे हिंगे पाटील पुढे म्हणाले की सहा महिन्यापासून खाजगी बँका ठेवी दराच्या ठेवी घेऊन पळून जात आहेत याबाबत कुठलाही लोकप्रतिनिधी बोलत नाही जिल्हा प्रशासनाकडे अनेक वेळा निवेदन दिली आंदोलन केली . मॉ साहेब जिजाऊ पतसंस्थे चे अध्यक्ष बबन शिंदे ठेवीदाराचे सर्व पैसे घेऊन पसार झाले होते अनेक निवेदन आंदोलन करून ठेवीदारांच्या खांदयाला खांधा देऊन मी संघर्ष उभा केला पाठीशी खंबीरपणे उभा राहिलो तेव्हा बबन शिंदे यांच्यावर गुन्हा दाखल झाला मात्र अटक झाली नाही या घोटाळ्यातील आरोपींना अंटक करण्यासाठी एस आय टी लावण्यासाठी प्रयत्न केला . ज्ञानराधा,साईराम राजस्थानी मल्टीस्टेट गेली अनेक दिवसापासून ठेवीदारांचे पैसे देण्यास टाळाटाळ करत आहे ज्ञानराधा मल्टीस्टेट चे कुटे यांच्या कडून तारखांवर तारखा मिळत आहेत मात्र गरीब जनतेचे पैसे दिले जात नाहीत साई राम अर्बन मध्येही असे च प्रकार घडत आहेत ठेवीदराचे पैसे देण्यासाठी तारखा मागून तारखा दिल्या जातात परंतु वेळेवर ठेवी मिळत नसल्यामुळे ठेवीदार घाबरून जातं आहेत मात्र घाबरून न जाता ठेवीदारांनी वंचित बहुजन आघाडीच्या पाठीमागे उभे राहावे बीड लोकसभेत खासदार म्हणून मला संसदेत पाठवा माझ्या गॅस सिलेंडर समोरील बटन दाबून मला प्रचंड मताने विजयी करा मला मतदान रुपी आशीर्वाद द्या. गरिबांची लूट आणि बँका नां सूट हे धोरण मी थांबावतो वरील तीनही पतसंस्था मधील ठेवी मिळवून देण्यासाठी मी सदैव आपल्या सोबत राहील असे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी सांगितले वेळप्रसंगी ठेविदारांच्या न्याय मागणीसाठी ॲड.प्रकाश आंबेडकर यांच्या मार्गदर्शनानुसार प्रत्येक ठेवीदाराची याचिका उच्च न्यायालयात दाखल करून निशुल्क न्यायालयीन लढाई लढली जाईल आम्ही सत्तेत असो किंवा नसो सतत सत्यासाठी आणि न्यायासाठी संघर्ष करीत आलेलो आहे त्यामुळे येणाऱ्या काळातही सत्यासाठी आणि न्यायासाठी सदैव गोर गरीबा जनतेची साथ देणार आहे न्याय मिळवून देणारा आहे म्हणून येणाऱ्या १३ तारखेला गॅस सिलेंडर या चिन्हा समोरील बटण दाबून मला मतदान रुपी आशीर्वाद द्या व मला संसदेत पाठवा आपल्याला न्याय मिळवून देण्याची हमी देतो आसे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी सांगितले

## मतदान केंद्रावरील केंद्राध्यक्ष व अन्य सहाय्यकांची सरमिसळ




बीड, दि.11 : बीड लोकसभा मतदारसंघातील 2355 मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्ष व अन्य सहायकांची आज सरमिसळ पद्धतीने निवड करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातील नॅशनल इन्फॉर्मेशन सेंटरच्या कार्यालयात निवडणूक निरीक्षक अजीमुल हक, जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे, यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच राजकीय पक्षाच्या समक्ष ही सरमिसळ प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. बीड लोकसभा मतदारसंघातील एकूण 2355 मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्ष व त्यांचे तीन सहकारी आणि राखीव अधिकारी कर्मचाऱ्यांची अशा एकूण 10,432 नावांची सरमिसळ प्रक्रियेद्वारे आज निवड झालेली आहे. निवड झालेल्या मतदान केंद्र अध्यक्ष तथा सहकाऱ्यांना उद्या रविवार दिनांक 12 मे रोजी सहा विधानसभा मतदार संघातील निश्चित मतदान केंद्र सांभाळण्यासाठी त्यांना निघणे आहे. त्याप्रमाणे त्यांची रवानगी होईल.

## डोनगाव (बु )येथे अखंड शिवनाम सप्ताह व ग्रंथराज परमरास्य पारायण




बिलोली तालुक्यातील डोणगाव येथे डॉ श्री गुरु १०८ विरूपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर यांच्या कृपाशीर्वादाने प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी अखंड शिवनाम सप्ताह व ग्रंथराज परमराश्य पारायण सोहळाचे दिनांक ०९/०५/२०२४ ते दिनांक १६/०५/२०२४ पर्यंत करण्यात आले आहे शिवनाम सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम पाहाटे ४ ते ६ शिवपाठ ६ ते ८ रूद्रअभिषेक ८ ते ९ परमरास्य पारायण,१० ते ११ प्रवचन, दुपारी १२ ते २ पंगतप्रसाद व विश्रांती २ ते ४ गाथा भजन, ४ ते ६ शिवपाठ(श्री गुरु समवेत)६ ते ८ महाप्रसाद रात्री ९ ते ११ शिव कीर्तन व रात्री शिवजागर आदी कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार व गायक वादक आदींची उपस्थिती लाभणार आहे व दिनांक 16 मे रोजी प्रसाद किर्तन संपल्यानंतर भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आला आहे तरी परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावे असे आवाहन समस्त गावकरी मंडळी डोणगाव ( बु )यांनी केले आहे

## तीसरी खर्च तपासणी १२ मे रोज़ी खर्च निरीक्षक करणार निवडणूक लेखांची तपासणी



बीड, दि.11:- निवडणूक खर्च निरीक्षक सुसांता कुमार बिस्वास हे तीसरी निवडणूक खर्च लेखांची तपासणी रविवार दिनांक 12 मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात करणार आहेत. अशी माहिती निवडणूक खर्च संनियंत्रण कक्षाच्यावतीने कळविण्यात आली आहे. 39 बीड लोकसभा मतदारसंघात सोमवार दिनांक 13 मे रोजी मतदान होणार आहे. त्या अनुषंगाने लोकसभा निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांना खर्चाची लिखित नोंद ठेवावी लागते.

भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार या लेखांची तपासणी निवडणूक खर्च निरीक्षक यांच्याकडून मतदान होण्यापूर्वी तीन वेळा करावी लागते. त्याप्रमाणे यापूर्वी 4 व 8 मे रोजी करण्यात आलेली आहे.

उमेदवारांना नोंदवही दिलेली असून त्यांनी केलेला खर्च व्यवस्थितरित्या लिहावा असे अपेक्षित आहे. लिहिलेल्या नोंदी तपासून खर्च निरीक्षकाच्या स्वाक्षरी घेणे हे उमेदवार अथवा उमेदवाराचे प्राधिकृत प्रतिनिधी यांचे काम असते. यात तफावत असल्यास उमेदवारांना नोटीस जारी करण्यात येते. खर्चाच्या नोंदी नीट लिहाव्या यासाठी मार्गदर्शनही केले जाते. यापूर्वी प्रशिक्षणाद्वारे नोंदी कशा घ्याव्या हे सांगण्यात आलेले आहे.

रविवार दिनांक 12 मे रोजी तिसरी खर्च तपासून जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात सकाळी 10 ते सांय. 5 वाजता खर्च निरीक्षक सुसांता कुमार बिस्वास हे करणार आहेत. यापूर्वी ज्या उमेदवारांनी खर्चाची तपासणी केलेली नसेल त्या सर्व उमेदवारांना खर्च तपासणी करून घेण्याची कायद्याने बंधनकारक आहे.

# मराठा मुस्लिम समाज पूर्ण ताकतीने बजरंग सोनवणे यांच्या पाठीशी-अयुब पटेल ,बालाजी धायगुडे

## पोळी भाजण्याच पाप या भाजप सरकारने केले आहे.

भाजप सरकार मागील १० वर्षापासून गल्ली पासून ते दिल्ली पर्यंत सत्तेत आहे मात्र विकास कुठे जन्मला आला नाही उलट या भाजप सरकारने मागील दहा वर्षात सत्तेचा गैर वापर करून फक्त जाती धर्माच्या नावाने समाजा समाजात तेढ निर्माण करण्याच काम केले आहे. गुण्या- गोविंदाने राहणारे हिंदू मुस्लिम बांधव यांच्यात फूट पाडून स्वतःची राजकिय पोळी भाजून घेतली म्हणूनच मुस्लिम समाजाने आता निर्णय केला आहे भाजप सरकार वर असलेला मुस्लिम समाजाचा रोष येत्या लोकसभेच्या मतपेटीतून व्यक्त करून भाजपाला हद्दपार करण्यासाठी मुस्लिम व मराठा समाज महाविकास आघडी व शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या सोबत आहे . शरदचंद्र पवार यांनी कधीच जातीपातीचे राजकारण केल नाही ज्यावेळेसे आघाडीचे सरकार होते त्यावेळेस मुस्लीम व मराठा समाजाला नेहमीच प्रतिनिधित्व व अनेक आमदारांना मंत्री केले विकासकामासाठी कधीच निधी कमी पडु दिला नाही. त्यामुळे मुस्लिम व मराठा समाज राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना विजयी करण्यासाठी खंबीरपणे उभा आहे असा शब्द अयुब जाफर पटेल व बालाजी धायगुडे याच्याकडून देण्यास आला.आहे



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ


# लोकआरंभ

रविवार १२ मे २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4




# छत्रपतींचा आशीर्वाद ; बहिणीच्या प्रचारासाठी उदयनराजे भोसले खास साताऱ्याहून आले जिल्ह्यात

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला मतदारांना विश्वास




(कडा आष्टी प्रतिनिधी) छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशज छत्रपती उदयनराजे भोसले खास साताऱ्याहून बहिणीच्या म्हणजेच पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी आज जिल्हयात आले होते. पंकजाताई तुमची मुलगी, बहीण, आहे. तिला मतदान करायचे नाही तर कोणाला करायचे? माझी भगिनी पंकजाताई मुंडेला आता संधी मिळाली आहे, तिला येत्या १३ तारखेला भरघोस मतदान करून विजयी करा. स्थिर सरकार सत्तेवर असते त्यावेळीच आपल्या भागाचा विकास होत असतो. तुम्ही सर्वजण सज्ञान आहात,तुम्हाला मताचा अधिकार आहे त्यामुळे कृपा करून माझ्या भगिनी पंकजाताईला निवडून द्या, अन्यथा मी राजीनामा देतो आणि पंकजाताईला तिकडून निवडून आणतो असे सांगत छत्रपती उदयनराजे महाराज भोसलेंनी कडा येथील जाहीर सभेत मतदारांना पंकजाताईला निवडून देण्याचे आवाहन करत भावनिक साद घातली. तर सर्व समाजाला सोबत घेऊन चालणारा नेते म्हणजे गोपीनाथ मुंडे होते.मराठवाड्याचे ते दैवत होते. जनतेच्या न्याय हक्कासाठी पंकजाताई मुंडे या कायम भूमिका घेऊन लढत असतात.पंकजाताई गोपीनाथ मुंडे साहेबांचा संघर्षाचा आणि विचारांचा वसा घेऊन वाटचाल करत आहेत. गोपीनाथराव मुंडे साहेबांनी संपूर्ण मराठवाड्याला आपले कुटुंब मानले होते. सर्व जाती,धर्म, उपेक्षित, वंचित बहुजन समाजाला सोबत घेऊन त्यांनी समाजकारण आणि राजकारण केले. मराठवाड्याच्या मागासलेपणाचा शिक्का पुसण्यासाठी आणि बीड जिल्ह्याला विकासाच्या प्रवाहात कायम ठेवण्यासाठी येत्या 13 तारखेला भाजप महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना प्रचंड बहुमताने विजयी करा, पंतप्रधान मोदीजी आणि माझे आता छान जमते आहे. मोदी साहेबांच्या मंत्रिमंडळात पंकजाताईंना घ्या अशी शिफारस मी स्वतः करेन असा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे व्यक्त केला. पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ अमोलक जैन विद्यालय येथे आयोजित सभेत छत्रपती उदयनराजे महाराज भोसले आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे एकाच मंचावर एकत्रित आले होते. व्यासपीठावर उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्यासह पालकमंत्री धनंजय मुंडे, आमदार सुरेश धस, आमदार बाळासाहेब आजबे, माजी आमदार भीमराव धोंडे, परभणी लोकसभेचे उमेदवार महादेव जानकर, डॉ. योगेश क्षीरसागर, डॉ. शिवाजी राऊत, सविता गोल्हार, पप्पू कागदे आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलतांना उदयनराजे म्हणाले, तुम्ही सर्वजण पंकजाताईंना या निवडणुकीत विजयी करा, पंकजाताई तुमची मुलगी आणि बहीण आहे. तिला मतदान करायचे नाही तर कोणाला करणार? पंकजाताईंना तुम्ही मतदान केले नाही तर मी तिकडे राजीनामा देऊन पंकजाताईंना निवडून आणतो,

# जरंडी, निंबायतीत कॉर्नर बैठका व प्रचार फेऱ्यांनी धुरळा



लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शनिवारी प्रचाराच्या शेवटच्या दिवशी सकाळी सात वाजेपासून प्रचार फेऱ्या व कॉर्नर बैठकांनी प्रचाराचा धुराळा उडाला होता यावेळी निंबायती व जरंडी गावात भाजप च्या वतीने जोरदार शक्तिप्रदर्शन करत उमेदवार रावसाहेब दानवे यांच्या प्रचार निमित्ताने गावात रॅली काढण्यात आली व मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या महिला आघाडीच्या पुष्पाबाई काळे, तालुकाध्यक्ष वंदनताई पाटील,स्वाती पाटील आदींनी बहुलखेडा, निंबायती जरंडी गावात कॉर्नर बैठका घेतल्या रॅलीच्या वेळी माजी पंचायत समिती सदस्य संजीवन सोनवणे, उपसरपंच संजय पाटील, दिलीप पाटील मधुकर पाटील, अमृत राठोड, शांताराम पाटील, आदींसह कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# मतदान केंद्रावर असणार पाळणाघर-विश्रांती कक्ष जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची प्रातिनिधिक केंद्राला भेट

**प्रतिनिधी/बीड**

बीड: शहरातील चंपावती विद्यालय बीड या मतदान केंद्राच्या ठिकाणी महिला मतदारासाठी पाळणाघर, विश्रांती कक्षाचीची पाहणी जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे, एम.एफ. कक्षाच्या प्रमुख तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगितादेवी पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. चंद्रशेखर केकाण यांनी पाहणी केली.



बीड शहरातील पश्चिम कार्यालयाच्यावतीने बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) बीड पश्चिम कार्यालयाच्या वतीने प्रकल्पांतर्गत बीड शहर-11, गेवराई शहर-3, आष्टी-2, पाटोदा-10 व शिरुर शहर-2 असे एकूण 28 महिला मतदारासाठी पाळणाघर, विश्रांती कक्ष स्थापन करण्यात आलेले आहे.

# २०१३ कायद्याने पुनर्वसन व्हावे यासाठी उरण तालुक्यातील शेतकऱ्यांचे आंदोलन

गोवर्धन राजाराम पाटील वय - ६० वर्षे,धनाजी राजाराम पाटील वय-६३ वर्षे, भिमाबाई कृष्णा पाटील वय-७२ वर्षे,संतोष कृष्णा पाटील वय-५२ वर्षे, संजय कृष्णा पाटील वय-५० वर्षे,शेखर कृष्णा पाटील वय-४८ वर्षे हे सर्व शेतकरी मु. चिर्ले, पो. जासई, ता. उरण, जि. रायगड येथील रहिवाशी आहेत. सदर सर्व अर्जदार शेतकरी ताबे , कब्जा, वहिवाट,मालकीने, कसत असलेल्या शेतजमिनीचा सर्व्हे नंबर ५९-ब , क्षेत्र-१२ गुंठे मौजे-जांभुळपाडा, ता. उरण, जि. रायगड ही जमिन विरार अलिबाग कॅरिडॉर प्रकल्पामध्ये बाधित होत असून त्यांचे पुनर्वसन भूसंपादन कायदा २०१३ नुसार करण्यात यावे. जमिनीस बाजारभाव प्रतिगुंठा ५ कोटी रूपये मिळावा. त्याप्रमाणे त्यांच्या कॅन्टीनचे (हॉटेल) व्यावसायिक पुनर्वसन व्हावे, सरकारी नोकऱ्या, प्रकल्पग्रस्त दाखले मिळावे. विकास कामात प्रकल्पग्रस्तांना ५० टक्के विकास कामे मिळावीत. अशा विविध मागण्या सदर शेतकऱ्यांचे असून या मागण्या तात्काळ मान्य न झाल्यास सदर सर्व शेतकरी गावठाण चळवळीचे अभ्यासक राजाराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मेट्रो सेंटर कार्यालय पनवेल येथे आमरण उपोषणास बसणार आहेत. संबंधित मागणी शेतकऱ्यांची न्याय मागणी आहे. प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाट तपासणे हे सरकारचे काम आहे. यासाठी मा. जिल्हाधिकारी रायगड यांनी सोशल इम्पॅक्ट रिपोर्ट सादर करणे गरजेचे आहे. तो न झाल्यामुळे सातबारा सदरी असलेल्या परंतु प्रत्यक्षात जमिनीचा ताबा नसलेल्या व्यक्तीला पुनर्वसन मिळणे म्हणजे आम्हा ७० वर्षे ताबा कब्जा असलेल्या शेतकरी अर्जदारांची फसवणूक आहे. या प्रकरणात आम्ही रस्त्यावर तसेच प्रशासकीय, पोलीस स्टेशन येथे गुन्हे नोंदविणार आहोत. परंतु प्रत्यक्ष ताबा कब्जा असलेल्या शेतकऱ्यांचा पंचनामा न करता होणाऱ्या भूसंपादन प्रक्रिये विरोधात रत्यावर आक्रमक आंदोलन शेतकरी नेते मा. राजाराम पाटील, अध्यक्ष-शेतकरी प्रबोधिनी यांच्यामार्फत करणार आहोत याची नोंद घ्यावी.अशी माहिती शेतकरी गोवर्धन पाटील यांनी दिली.आम्ही शासन दरबारी ग्रामपंचायत दाखला, घरपट्टी, जागेचा नकाशा, फोटो, चतुःसिमांच्या मालकांचा पंचनामा आमची सत्य प्रतिज्ञापत्रे अर्जासोबत जोडली आहोत. सदरील सर्व्हे नं. ५९-ब, क्षेत्र- १२ गुंठे पंचनामे करण्याचा आदेश मा. तहसिलदार, मा. उरण भूमी अभिलेख यांनी तात्काळ द्यावेत अशी मागणी संबंधित शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे केली आहे.मागण्या मान्य न झाल्यास आमरण उपोषण करण्याचा निर्धार संबंधित शेतकऱ्यांनी केला आहे.आपल्या मागण्या मान्य व्हाव्यात यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री,गृहमंत्री,मुख्यसचिव, महसूल मंत्री, महसूल सचिव,नगरविकास मंत्री,पालकमंत्री,पुनर्वसन मंत्री, उपसंचालक भूमी अभिलेख मुंबई, विभागीय कोकण आयुक्त, जिल्हाधिकारी रायगड, जिल्हा अधीक्षक रायगड, प्रांताधिकारी पनवेल, उपजिल्हाधिकारी(भू- संपादन)मेट्रो पनवेल, तहसीलदार उरण आदी ठिकाणी पत्रव्यवहार देखील केला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com